तरुण भारत
दि. 13.02.2018

'विवेकानंद'मध्ये उद्या 'स्पंदन'चे उद्घाटन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये बी. व्होक. ग्राफिक डिझाईन विभागातून भाग एक ते तीनमधील विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे वार्षिक कलाप्रदर्शन 'स्पंदन-२०१८' चे आयोजन १४ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत केले आहे, अशी माहिती विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांची माहिती

प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, स्पंदनचे उदघाटन १४ रोजी सकाळी १० वाजता पूणे येथील जेष्ठ चित्रकार व कला अभ्यासक सुधाकर चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थान भुषवणार आहेत. तसेच प्रमुख पाहूणे प्रा. डॉ. सुभाष पवार, पूणे यांचे डीजिटल आर्ट या विषयावर परिसंवाद व स्लाईड शोचे आयोजन केले आहे. तर सचिव, प्राचार्या शुभांगी गावडे प्रमुख उपस्थिती दर्शवणार आहेत. १५ रोजी मुंबई येथील चित्रकार सुरभी गुळवेलकर यांचे व्यक्तीचित्रणाचे प्रात्यक्षिक होणार आहे. १६ रोजी विवेकानंद संस्थेतील माजी विद्यार्थी शिल्पकार प्रशांत गायकवाड, कराड यांचे व्यक्तीशिल्पाचे प्रात्यक्षिक आयोजीत केले आहे.

म.टाइम्स, 13.2.2018

'विवेकानंद'मध्ये रंगणार 'स्पंदन'

कोल्हापूर टाइम्स टीम

विवेकानंद कॉलेजमध्ये यूजीसीच्या अनुदानामधून शिवाजी विद्यापीठ व शासन मान्यताप्राप्त कौशल्यावर आधारीत बी. व्होक. ग्राफिक डिझाइन व फाउंड्री टेक्नॉलॉजी विभागाचे पदवी, पदविका अभ्यासक्रम गेली तीन वर्षे सुरू आहेत. बी. व्होक. ग्राफिक डिझाईन विभागातील विद्यार्थ्यांच्या वर्गकामांचे व कलाकृतींचे 'स्पंदन-२०१८' या वार्षिक कलाप्रदर्शनाचे आयोजन १४ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत संस्थेच्या बापूजी साळुंखे सभागृहात सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

समारंभासाठी उद्घाटक म्हणून पुणे येथील जेष्ठ चित्रकार व कला अभ्यासक सुधाकर चव्हाण उपस्थित राहणार आहेत. 'स्पंदन' प्रदर्शनामध्ये सुधाकर चव्हाण यांची 'चारकोल' पेंटिंग याविषयी कार्यशाळा तसेच प्रात्यक्षिक आयोजित केले आहे. प्रा. डॉ. सुभाष पवार यांचा 'डिजिटल आर्ट' या विषयावर परिसंवाद व स्लाईड शो होणार आहे. गुरुवारी (ता. १५ फेब्रुवारी) मुंबईतील सुप्रसिद्ध चित्रकार सुरभी गुळवेलकर यांचे व्यक्तीचित्रणाचे प्रात्यक्षिक होणार आहे. शुक्रवारी (ता. १६ फेब्रुवारी) विवेकानंद संस्थेतील माजी विद्यार्थी शिल्पकार प्रशांत गायकवाड यांचे व्यक्तीशिल्पाचे प्रात्यक्षिक आयोजित केले आहे.

१४ फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाइन डेनिमित्त विद्यार्थ्यांसाठी लव आर्ट डे साजरा करण्यात येणार आहे. यात आपल्याला येणारी कला प्रात्यक्षिकसह सादर करायची आहे. या कलाप्रदर्शनाच्या प्रात्यक्षिकांचा व कार्यशाळांचा लाभ विद्यार्थी व कलारसिक यांनी घ्यावा असे आवाहन व समन्वयक प्रा. एस. बी. गायकवाड यांनी केले.

यावेळी प्रसिद्धीप्रमुख बी. के. गोसावी, विभागप्रमुख प्रा. राहुल इंगवले, प्रा. सतिश उपळाविकर, प्रा. धिरज निंबाळकर आदी कार्यक्रमाला उपस्थित होते. MT-13/2

पुढारी, 13.2.2018

'विवेकानंद'मध्ये उद्यापासून स्पंदन कलाप्रदर्शन : प्राचार्य होनगेकर

कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित विवेकानंद महाविद्यालयाच्या बी. व्होक. ग्राफिक डिझाईन विभागाच्या वतीने दि. १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान विद्यार्थ्यांच्या वर्ग कामांचे व कलाकृतींचे वार्षिक कलाप्रदर्शन 'स्पंदन-२०१८' चे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ.एस.वाय.होनगेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमाचे उद्घाटन पुणे येथील ज्येष्ठ चित्रकार व कलाअभ्यासक सुधाकर चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असणार आहेत. प्रदर्शनात सुधाकर चव्हाण यांच्या चारकोल पेंटिंग यावर कार्यशाळा व प्रात्यक्षिक होणार आहे. प्रा. डॉ. सुभाष पवार, पुणे यांचे 'डिजिटल आर्ट' विषयावर परिसंवाद व स्लाईड शोचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (दि.१५) मुंबई येथील चित्रकार सुरभी गुळवेलकर यांचे व्यक्ती चित्रणाचे प्रात्यक्षिक होणार आहे. दि. १६ रोजी माजी विद्यार्थी शिल्पकार प्रशांत गायकवाड, कराड व्यक्ती शिल्पाचे प्रात्यक्षिक दाखविणार आहेत. यावेळी सहयोगी प्रा. सतीश गायकवाड, प्रा. राहुल इंगवले, प्रा.बी.के.गोसावी आदी उपस्थित होते. P 13/2

लोकमत
दि. 13.2.2018

सकारात्मक बदल घडविणारा उपक्रम

'लोकमत'च्या महामॅरेथॉन स्पर्धेच्या निमित्ताने या अभिनव उपक्रमात युवक, युवती सहभागी होतील आणि त्यांना व्यायामाचे महत्त्व कळेल. 'लोकमत'चा उपक्रम नवीन पिढीसाठी अतिशय उपयुक्त आहे. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महामॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन आपल्या आयुष्यात चांगला बदल घडवून आणावा.

- प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर,
विवेकानंद कॉलेज